सावरकर आणि समाजकारण

डॉ. जयंत नारळीकर

# सावरकरांची विज्ञाननिष्ठा

## सावरकरांच्या विज्ञाननिष्ठ विचारांतून त्यांचे द्रष्टेपण दिसून येते

आज भारतात 'वैज्ञानिक दृष्टिकोन' 'विज्ञानयुग' 'एकविसाव्या शतकाकडे वाटचाल' इत्यादींचा बराच बोलबाला होत आहे. जगभर विशेष करून प्रगत पाश्चात्य देशात विज्ञान आणि तंत्रज्ञान याची मदत घेऊन समाज भराभर पुढे जात आहे, आपणही त्या विषयांचे महत्त्व ओळखून पावले टाकायला हवीत याची जाणीव काही निवडक विचारवंतांना होत असते. परंतु बहुसंख्य समाज आणि त्याचे नेतृत्व करणारे ह्या बाबतीत उदासीन तरी आहेत किंवा 'नाम के वास्ते' त्यावर भाषणे ठोकायला तयार असतात.

ह्या आजच्या पार्श्वभूमीवर, कित्येक दशकांपूर्वी वैज्ञानिक दृष्टिकोनाची बाजू मांडणारे आणि तो दृष्टिकोन प्रत्यक्ष कृतीत आणणारे असे स्वातंत्र्यवीर सावरकर – त्यांना आदरांजली वाहावीशी वाटते. सामान्य माणसापुढे सावरकरांची जी प्रतिमा आहे, त्यात त्यांचे स्वातंत्र्ययुद्धातले कर्तृत्व आणि हिंदू धर्माविषयीचा अभिमान ह्या गोष्टी प्रामुख्याने मांडल्या जातात. ते विज्ञाननिष्ठही होते हे तितकेसे ठासून सांगितले जात नाही. आज ते सांगण्याची आवश्यकता आहे.

विज्ञानयुगाची चाहूल सावरकरांना स्वातंत्र्यपूर्व काळातच लागल होती. यंत्राचे महत्व त्यांनी जाणले होते. आपल्या 'यंत्र' ह्या लेखात त्यांनी तंत्रज्ञानाकडे कसे पहावे हे अत्यंत कळकळीने मांडले आहे, युरोपात सुबत्ता आहे, तेथील राष्ट्रे प्रगत आणि सबळ आहेत याचे कारण त्यांनी गेल्या दोनशे वर्षात तंत्रज्ञानाचा विकास केला आणि विज्ञानाचा पाया भक्कम केला. आपल्या देशातील मोगल राज्यकर्ते किंवा त्यानंतरची मराठेशाही यांनी ह्या विषयाचे महत्त्व ओळखले नाही. आपण कर्मकांडात गुंतून पडलो आणि आपले स्वातंत्र्य गमावून बसलो. सावरकरांनी हे स्पष्टपणे सांगितले होते. ब्रिटिश राजसत्तेशी झगडणारा हा स्वातंत्र्यसेनानी शत्रूच्या गुणांचे चीज करू शकत होता. त्याचा देशाभिमान व धर्माभिमान आंधळा नव्हता.

प्रख्यात शास्त्रज्ञ अब्दूल सलाम यांनी एक बोलके उदाहरण दिले आहे. ताजमहाल आणि सेंट पॉलचे कथीड्रल या दोन्ही इमारती एकाच वेळी अस्तित्वात आल्या. दोन्ही वास्तुकलेचे उत्कृष्ट नमुने मानल्या जातात. पण सेंट पॉल बांधून झाले त्यानंतर लवकरच आयझक न्यूटनच्या मार्गदर्शनाखाली इंग्लंडमध्ये विज्ञान वाढू लागले. भारतात मात्र त्याच्या समांतर वैज्ञानिक प्रगती झाली नाही. तशी प्रगती व्हावी अशी प्रेरणा राज्यकर्त्यांना झाली नाही हे भारताचे दुर्दैव.

सावरकर धर्माभिमानी होते पण धर्मांध नव्हते. 'ईश्वराचे अधिष्ठान म्हणजे काय?' किंवा 'धर्मभोळेपणाचा कळस' ह्या लेखात त्यांनी धर्माकडे डोळसवृत्तीने पाहिले. व्रतवैकल्ये, नवस, यज्ञ, पोथीनिष्ठता इत्यादींवर त्यांनी आसूड ओढले. केवळ हिंदू धर्मातच नव्हे तर इतर धर्मांतही धर्माचा चांगुलपणा धर्मभोळेपणामुळे कसा झाकला जातो याची त्यांनी अनेक उदाहरणे दिली.

केवळ लेखन व भाषणे यांच्यापर्यंतच सावरकरांची विज्ञाननिष्ठा मर्यादित नव्हती. सनातन्यांचा रोष ओढवून त्यांनी आपले विचार आचरणात आणून दाखवले. वैज्ञानिक योग्य तपासणी केल्याशिवाय कुठलीही गोष्ट प्रमाण मानत नाही. तपासणी केवळ वैचारिक नसून प्रत्यक्ष प्रयोगांवर आधारलेली असते. भारतीय समाजाला अठराव्या शतकातून एकवीसाव्या शतकाकडे खेचून न्यायला वैज्ञानिक दृष्टिकोन आवश्यक आहे हे सावरकरांनी ओळखले होते. त्यातच त्यांचे द्रष्टेपण दिसून येते. □

**डॉ. जयंत नारळीकर**
७०१, भास्करा, कुलाबा हौसिंग कॉलनी
होमी भाभा रोड
मुंबई ६